पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०८

**सभावृत्तांत**

दिनांक – **०५/०३/२०२१** वेळ - **दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **मा.विधी समिती**ची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **०५/०३/२०२१** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते.

१. **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे - सभापती**
२. मा.वसंत प्रभाकर बोराटे
३. मा.सुजाता सुनिल पालांडे
४. मा.चौगुले सीमा दत्तात्रय
५. मा.गोफणे अनुराधा देविदास
६. मा.सुलक्षणा राजू धर
७. मा.पौर्णिमा रविंद्र(आप्पा)सोनवणे
८. मा.अमित राजेंद्र गावडे

या शिवाय मा.आगळे- सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप- नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) प्र.क्र.२८ मधील कोकणे चौक ते काळेवाडी फाटापर्यंत रस्त्याचे विद्युत विषयक कामे करणे(प्रकाश व्यवस्था करणे).

विषय क्र.३) च-होली मैलाशुध्दीकरण केंद्रांअंतर्गत प्रभाग क्र.३ मधील भोसरी बणाचा ओढा व वाळके मळा परिसरात मलवाहिनी सुधारणा कामे करणे.- मा.पौर्णिमा सोनवणे, मा.सीमा चौगुले यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) प्रभाग क्र.३२ मध्ये सारथी वेबवरील तक्रारी निवारणा करिता स्थापत्य विषयक कामे करणे.- मा.सीमा चौगुले, मा.पौर्णिमा सोनवणे यांचा प्रस्ताव

**---------**

**अ) दिनांक २२/०२/२०२१ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०७) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

**----------**

ठराव क्रमांक - २५ विषय क्रमांक -०१

दिनांक - ०५/०३/२०२१ विभाग- ग क्षेत्रीय विद्युत

सुचक :मा.सीमा चौगुले अनुमोदक :मा.वसंत बोराटे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वि/गक्षे/थेर/३/२६४/२०२० दि.०३/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.-

मे.ईगल इंन्फ्रा इंडिया लि. यास कामाचे आदेश निर्गत (निविदा दर ५.८६% कमी) करणेत आलेले आहे. सदर कामासाठी मे. शशि प्रभु असो. यांची सल्लागार म्हणून नेमणुक करणेत आलेली आहे. सद्यास्थितीत सदर ठिकाणचे काम चालु आहे.पिंपरी प्रभाग क्र. ४३ जिजामाता रुग्णालयासाठी नवीन इमारत बांधणे हे काम यापुर्वी निविदा शेडुल मधील सर्व बाबींचे निविदा रक्कम या मर्यादेत पुर्ण झाले असुन सदर इमारत वैद्यकिय विभागाकडे हंस्तांतरीत करणेत आली आहे. तसेच सदर कामाचे अंतीम बील तयार करणेत आले असुन अदायगीसाठी लेखा विभागाकडे सादर केलेले आहे. कोरोना कोवीड– १९ मुळे प्रतिबंधक उपाय म्हणुन रुग्णालयात १०० बेडची व्यवस्थापनाचे काम मा. आयुक्त साहेब व मा. वैद्यकिय अधिकारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे काम सुरु केले आहे. सदरच्या सुचने मध्ये जिजामाता रुग्णालय येथील डॉक्टर (वैद्यकिय अधिकारी) निवासस्थानासाठी विद्युत व्यावस्था करणेचे व रुग्णालयाकरीता एक्सप्रेस फिडर द्वारे अखंडीत वीजपुरवठा करणेकामी मराविवि कंपनी व विद्युत विभागाचे सहशहर अभियंता विद्युत/ यांत्रिकी यांचे समवेत याबाबत चर्चा होऊन रिंग मेन युनिट बसवुन केबल चार्ज करुन एक्सप्रेस फिडर द्वारे वीज पुरवठा करणे बाबत सुचना व आदेश देण्यात आले व त्या कामावर झालेला खर्च रक्कम रु ८२,५५,०००/-थेरगाव येथील चालु असलेल्या रुग्णालयाच्या कामातअतिरिक्त बाब (Extra Item)म्हणुन समावेश करुनमे. ईगल इंन्फ्रा इंडिया लि. यांना अदा करणेत यावा असा प्रस्ताव मा. आयुक्त सो. यांनी दि. १३/५/२०२० च्या प्रस्तावानुसार मंजुर केला आहे व त्या खर्चास जागेत बदल होत असल्याने मा.विधि समितीची मान्यता घेणेची आवश्यकता आहे. त्यास अनुसरुन संबधीत ठेकेदारांने काम सुरु केले आहे. वर नमुद केल्या प्रमाणे मुळ चालु असलेल्या कामाच्या जागेत बदल होत असल्याने यांस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - २६ विषय क्रमांक -०२

दिनांक - ०५/०३/२०२१ विभाग- ड क्षेत्रीय विद्युत

सुचक :मा.पौर्णिमा सोनवणे अनुमोदक :मा.सीमा चौगुले

संदर्भ : मा.सह शहर अभियंता(वि)यांचे पत्र क्र.डक्षे/वि/वाकड/४३/२०२१ दि.०१/०३/२०२१

मा.सह शहर अभियंता(वि)यांनी शिफारस केलेप्रमाणे.-

स्थापत्य विभागामार्फत कोकणे चौक ते रायल पार्क पर्यतचे मनपा हद्दी पर्यंतचा रस्ता विकसीत करण्यात आला आहे, त्यापुढे मनपा हद्दीपासुन ते BRT रस्ता पर्यंत PCNTDA च्या हद्दीत आहे. सदर रस्ता मनपाचे ताब्यात आलेला नसल्याने सदर ठिकाणचे रस्त्याचे

स्थापत्य काम रद्द करण्यात आले असुन सदरचे रद्द झालेले काम मा. महापालिका सभा ठराव क्र. ४०७ दि. ६/६/१९ व मा. महानगरपालिका सभा ठराव क्र. ४८० दि. २०/११/२०१९ अन्वये विषयांकित रस्त्याचे लगतच्या रस्त्यांवर करण्यासाठी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यामुळे एजन्सीने स्थापत्य विभागामार्फत विकसीत करण्यात आलेल्या कोकणे चौक ते मनपा हद्दीपर्यंतच्या रस्त्यावर प्रकाश व्यवस्था करण्याचे काम पुर्ण केलेले आहे. विषयांकीत रस्त्याचे कामाचा स्कोप कमी झालेमुळे विषयांकित कामांतील र. रू. १३.६६ लक्ष चे काम शिल्लक आहे. सदर परिसराचे स्थानिक नगरसदस्य यांनी तसेच विषयांकीत कार्यस्थळानजिकच्या रस्ते १) रायलपार्क ते भारतगॅस BRT पर्यंतच्या रस्ता २) SNBP शाळा रस्ता ३) कोकणे चौक ते गोडांबे चौक पर्यंतच्या रस्ता ( कापसेलॉन्स ) ४)झिंझुर्डे मळारस्ता ५) विश्वशांती कॉलनी अंतर्गत रस्ते या ठिकाणीचे गंजलेले खांब बदलून मिळणे कामी विनंती केली आहे. तसेच प्र. क्र. २८ चे परिसरातील वाकड वाय जंक्शन ते साई चौक या BRTS रस्त्यावर डाव्या बाजूला EHVलाईन असल्यामुळे, त्या ठिकाणी दिवे बसविण्यात आलेले नाही. परंतु मा. वाहतुक निरिक्षक यांनी सदरच्या रस्त्यावर अंधारामुळे अपघात होऊन नागरिकांचे जिवीतांस धोका होत असल्यामुळे दिवे तातडीने बसविणे कामी कळविले असुन, सदरचे ठिकाणी दिवे बसविणे आवश्यक आहे. सबब नि. क्र. २६/३-१८/१९ मधील शिल्लक रक्कमेतुन, उपरोक्त विषयांकीत कामांतर्गत जागा ताब्यात न आलेमुळे उर्वरीत काम प्रभाग क्र. २८ मधील लगतच्या रस्त्यांवर करणे साठी मा. महापालिका सभेने ठराव क्र.४०७ दि.०६/०६/२०१९ व मा. महानगरपालिका सभा ठराव क्र. ४८० दि. २०/११/२०१९ अन्वये प्रशासकिय मान्यता दिलेली असल्याने तसेच विषयांकीत कामांतर्गत शिल्लक साहित्य वापरून वर नमूद ठिकाणचे खांब बदलून देणे कामी मा.नगरसदस्य यांनी विनंती केलेनुसार तसेच मा.वाहतुक निरिक्षक यांनी कळविले नुसार कार्यस्थळ बदलास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७ विषय क्रमांक -०३

दिनांक - ०५/०३/२०२१

सुचक : मा.पौर्णिमा सोनवणे अनुमोदक : मा.सीमा चौगुले

संदर्भ : मा,पौर्णिमा सोनवणे, मा.सीमा चौगुले यांचा प्रस्ताव.

च-होली मैलाशुध्दीकरण केंद्राअंतर्गत प्रभाग क्र.३ मधील भोसरी बणाचा ओढा व वाळके मळा परिसरात मलवाहिनी सुधारणा कामे करणे नि.क्र.३/९२/२०१९-२० अन्वये काम चालु आहे. तसेच प्रभाग क्र.३ मधील विविध ठिकाणी रस्ते काँक्रीटीकरण करणेची कामे चालु आहे. सदर ठिकाणी अस्तित्वात असलेल्या जुन्या मलवाहिन्या लोकसंख्या वाढली असल्यामुळे व सदर मलवाहिन्यांमध्ये गाळ साचल्यामुळे त्या अपु-या पडत आहेत. त्यामुळे त्या ठिकाणी वाढीव व्यासाच्या नविन मलनि:सारण नलिका टाकणे अत्यावश्यक आहे. सदर बाबतची कार्यवाही करणेत येणार आहे. त्यामुळे प्रस्तावात नमूद कामामधून कामाचे स्थळ बदल करुन च-होली मैलाशुध्दीकरण केंद्राअंतर्गत प्रभाग क्र.३ मध्ये विविध ठिकाणी रस्ते काँक्रीटीकरण

करणेत येणा-या भागात तसेच विविध ठिकाणच्या जुन्या मलवाहिन्यांमध्ये मलनि:सारण विषयक कामे करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २८ विषय क्रमांक -०४

दिनांक - ०५/०३/२०२१

सुचक : मा.सीमा चौगुले अनुमोदक : मा.पौर्णिमा सोनवणे

संदर्भ : मा.सीमा चौगुले, मा,पौर्णिमा सोनवणे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.३२ मध्ये सारथी वेबवरील तक्रारी निवारणाकरिता स्थापत्य विषयक कामे करणे या कामास दि.३०/१२/२०१९ रोजी कामाचा आदेश देणेत आला आहे. सद्यस्थितीत काम चालू आहे. सदरचे काम सारथी वेबपोर्टलवरील तक्रारी निवारणा करणेसाठी काढणेत आले होते. सदर कामातून सारथी वेबपार्टलवरील तक्रारीचे निवारणा करणेकामी काम करणेत येत आहे. परंतू प्रभागात इतरही आवश्यक कामे करावयाची असल्याने सदर कामातून ती करणेकामी सदर कामाअंतर्गत सारथी वेबवरील तक्रारी निवारणाकरिता करणेच्या कामाखेरीज प्रभाग क्र.३२ मधील इतर स्थापत्य विषयक काम करणे असे कामाचे स्वरुप बदलास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कामय होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( स्वीनल कपिल म्हेत्रे )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१३३/२०२१
दिनांक :०९/०३/२०२१

**(उल्हास बबनराव जगताप)**
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.